क्र.अपोमसं (वा)/४३/प्रलि/ विधी अधिकारी नियुक्ती/१७/२०१८/८७९
अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय.
दिनांक :- ०९ /०३/२०२२

प्रति,

सहायक संचालक (जाहिरात)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**विषय:-** विधी अधिकारी गट अ पद कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबतची जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत .....

००००००

महोदय,

या पत्रासोबत पाठविण्यात येत असलेली जाहिरात कृपया प्रसिध्दीस देण्यात यावी, ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| १ | जहिरात देणा-या कार्यालयाचे नाव | अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) म राज्य, मुंबई<br>मोती महल, ६ वा मजला, १९५, जे.टाटा मार्ग,<br>सी.सी.आय.क्लब जवळ, सम्राट रेस्टॉरंट समोर,<br>चर्चगेट, मुंबई ४०० ०२०<br>भ्रमणध्वनी क्रमांक (०२२) २२८२०३११<br>ई मेल **adg.traffic.hsp@mahapolice.gov.in** |
| २ | कोणत्या तारखेस/तारखेपूर्वी जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे | १४/०३/२०२२ |
| ३ | प्रसिध्दीचे स्वरुप | मुंबई शहर |
| ४ | जाहिरात किती वृत्तपत्रांमधून व किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे | एकदा- म. टाईम्स, लोकसत्ता, लोकमत |
| ५ | जाहिरात देयक प्रदान करण्याकरिता कोणत्या नावाने पाठविण्यात यावे | अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) म राज्य, मुंबई<br>मोती महल, ६ वा मजला, १९५, जे.टाटा मार्ग,<br>सी.सी.आय.क्लब जवळ, सम्राट रेस्टॉरंट समोर,<br>चर्चगेट, मुंबई ४०० ०२० |

आपली विश्वासू,

सही/-

**( सुनीता साळुंके ठाकरे )**
पोलीस अधीक्षक (मुख्यालय),
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)
म.राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रत,

अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके, म.राज्य, मुंबई
कार्यासन अधिकारी, का.क्र. २-अ (पोलीस महासंचालक म.राज्य, मुंबई यांचे कार्यालय )

# <u>अर्जाचा नमुना</u>

## विधी अधिकारी गट अ पदासाठी अर्ज.

**कार्यालयीन उपयोगासाठी**

| | | |
|---|---|---|
| **१.** | **अर्ज क्रमांक** | ☐☐☐☐ |
| **२.** | **अर्ज स्विकारल्याचा दिनांक** | ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ |

एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा.

**सूचना :** १) अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

\# २) अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

* ३) आवश्यक नसेल तेथे खोडावे.

O ४) योग्य ठिकाणी ( ) खूण करावी.

### <u>अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती</u>

१) अर्जदाराचे संपुर्ण नाव :- आडनाव नाव वडीलांचे/पतीचे नाव

मराठीत : श्री./श्रीमती. ........................ ...................... ......................

\# इंग्रजीत : Mr./Mrs. ........................ ...................... ......................

\# २) जन्मतारीख (अंकात ) ☐☐☐☐☐☐☐☐

जन्मतारीख ( अक्षरात) .......................................................

३)जाहिरातीच्या दिनांकास वय ......... वर्षे .......... महिने ......... दिवस

* ४) लिंग :- पुरुष /महिला

५) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता: ............................................................................

............................................................................

शहर.............. , राज्य,..............., पिनकोड.....................

\# ६) भ्रमणध्वनी क्रमांक( मोबाईल) ...........................................................

\# ७) ई-मेल .........................................................................

* ८) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय : होय /नाही

९) शैक्षणिक अर्हता:-

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव (विद्यालय/महाविद्यालय) | गुण (टक्केवारी) |
|---|---|---|
| माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी अथवा जुनी ११ वी ) | | |
| उच्च माध्यमिक शाळांत परीक्षा (१२ वी ) | | |
| पदवी(विज्ञान, कला व वाणिज्य) | | |
| विधी पदवी | | |

O १०) इतर शैक्षणिक अर्हता:- संगणक प्रशिक्षीत आहे काय? होय ☐ नाही ☐

११) अर्जदाराची इतर माहिती:-

अ) सनद घेतल्याचा दिनांक

ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशिल

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | केसेस प्रकार | केसेसची संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

**टिप:-** वकीली व्यवसायाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

१२) यापूर्वी केलेल्या नोकरीचा तपशील:-

| अ.क्र. | संस्था/ कंपनीचे नांव | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |

O १३) अ- अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात/स्थानबध्द/बध्द/दंड करण्यात/सिध्ददोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना/निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून/ संस्थेकडून कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/ काढून टाकण्यात आले आहे काय? होय ☐ नाही ☐

O १३) ब- हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय? होय ☐ नाही ☐

(१३ अ किंवा १३ ब चे उत्तर होय असले तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दती,दंड,दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यांदीचे संपूर्ण तपशील आणि न्यायालय/विद्यापीठ/शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे. )

# <u>अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र</u>

मी श्री./सौ./कु.................................... या व्दारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती, खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनूसार व शैक्षणिक अर्हतेनूसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामूळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्यांची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहिल व त्याबाबतीत माझ्या विरूध्द कायदेशिर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण:-

दिनांक:-

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

**सोबत:** अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती .

## अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आस्थापनेवरील विधी अधिकारी गट अ यांचे पद पूर्णत : कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी जाहिरात

.......................................................................................................

क्रमांक : अपोमसं(वा)/४३/प्रलि/विधी अधिकारी नियुक्ती/१७/२०१८ मुंबई, दिनांक २८/०२/२०२२

अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाच्या आस्थापनेवरील मंजूर विधी अधिकारी गट अ चे १ पद ११ महिन्यांच्या करारावर पूर्णतः कंत्राटी पध्दतीने भरावयाचे असून, सदर पदाकरिता खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करु शकतात.

**उपलब्ध पदसंख्या :- ०१**

**वेतनश्रेणी :-** एकत्रित अनुज्ञेय मासिक वेतन + दूरध्वनी व प्रवास खर्च रु ३०,०००+ ५०००/-
मिळून **एकूण रु. ३५,०००/-** इतके असेल.

**पात्रताः- उमेदरवार भारतीय नागरिक असावा.**

**सूचनाः-**

१) विधी अधिकारी गट अ या पदाकरिता करावयाचे अर्ज अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, म राज्य, मुंबई अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) म राज्य, मुंबई, मोती महल, ६ वा मजला, १९५, जे.टाटा मार्ग, सी.सी.आय.क्लब जवळ, सम्राट रेस्टॉरंट समोर,चर्चगेट, मुंबई ४०० ०२० यांचे कार्यालयात अथवा रजिस्टर पोस्टाने **दिनांक १०/०३/२०२२ रोजी** १७.०० वा. पर्यंत प्राप्त होतील अशा रितीने पाठवावेत. शासकीय सुट्टीच्या दिवशी कार्यालयात अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

२) तसेच दिनांक १०/०३/२०२२ रोजी १७:०० नंतर अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच पोस्टाने दिनांक १०/०३/२०२२ रोजी १७:०० नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

३) अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे. सदर अर्ज लिफाफ्यात घालून त्यावर उजव्या बाजूस ठळक अक्षरात **''कंत्राटी विधी अधिकारी, गट अ पदासाठी अर्ज ''** असे नमूद करावे. विहित नमुन्यातील पूर्ण भरलेल्या अर्जासोबत पासपोर्ट साईजचे ०२ फोटो व पत्रव्यवहारासाठी उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे पोस्टेज स्टँम्पसह जोडावेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव यांच्या स्वः साक्षांकित प्रती जोडाव्यात.
**शुल्कः-** या कार्यालयाने निश्चित केलेले रु .२००/- ( अक्षरी रुपये दोनशे फक्त) परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईल.

१) डी.डी. २) स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेमध्ये चलनाव्दारे, **३) नेट बँकिंग, ४) डेबीट कार्ड, ५) क्रेडीट कार्ड.**

(डी.डी. ADDITIONAL DIRECTOR GENERAL OF POLICE TRAFFIC यांचे नावे, ) (**स्टेट बँक ऑफ इंडिया Account No.-** ३९२८३५३१६१०, **IFSC Code –** SBIN0000300**,** Main Mumbai Branch मध्ये चलनाव्दारे) विहित पध्दतीने कार्यालयास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**शैक्षणिक अर्हता:-**

१) उमेदवार मान्यताप्राप्त विदयापीठाचा कायदयाचा पदवीधर असावा व तो सनद धारक असेल.

२) उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत तसेच उच्च न्यायालयातील प्रकरणे, प्रतिज्ञापत्रे इत्यादी बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

३) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेचे उत्तम ज्ञान असेल.

४) जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायदयाविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायदयाचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**वय** :- जाहिरात प्रसिध्द झाल्या दिनांकास वय ६२ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**अनुभव:-**

१)" **विधी अधिकारी गट अ** " या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

**विधी अधिकारी गट - अ यांची कर्तव्ये व जबाबदा-या :-**

१) कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२) सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशाप्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे

४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७) विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे

८) संवेदनशील प्रकणांमध्ये पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

९) कायदा, सेवा व प्रशासनासंबंधी इतर अनुषंगिक कामे.

**अटी व शर्ती :-**

१) मा सर्वोच्च न्यायालयासमक्ष न्यायप्रविष्ठ असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या वतीने दाखल केलेल्या विशेष हक्क याचिका (सिव्हील) ३४७८८- ३४७८९/२०१२ च्या अंतिम आदेशास अधीन राहून सदर पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात येतील.

२) सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल, उमेदवाराला शासकीय कर्मचारी/अधिकारी गणले जाणार नाही.

३) अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, म राज्य, मुंबई या कार्यालयाच्या अधिपत्याखाली मंजूर असलेल्या ०१ विधी अधिकारी, गट अ या पदाकरिता निवडप्रक्रिया ही अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाच्या मार्फतीने राबविण्यात येणार आहे.

४) सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात येतील. ११ महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवळी (जास्तीत जास्त ०३ वेळा ११ महिन्यांकरिता) वाढविता येईल व ०३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतर अशा उमेदवारांना पुनश्च: निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

५) निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकीली व्यवसायाशी सबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिका-यांच्या लेखी परवानगी शिवाया करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिका-याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

६) उमेदवारांची निवड लेखी परिक्षेद्वारे व मुलाखतीद्वारे करण्यात येईल. लेखी परिक्षा ५० गुणांची व मुलाखत २५ गुणांची राहील. लेखी परिक्षेत व तोंडी परिक्षेत प्राप्त गुण एकत्रित करुन एकूण गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची कंत्राटी पद्धतीने नेमणुकी संबंधी कार्यवाही करण्यात येईल. तसेच नियुक्ती देणेसाठी कमीत-कमी ६०% गुण असणे आवश्यक राहील. लेखी परिक्षेचा व मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल किंवा या कार्यालयाच्या संकेतस्थळावर पाहता येईल.

७) बहुपर्यायी लेखी परिक्षेकरिता व मुलाखतीकरिता मुख्यत्वे खालील नमूद बाबींवर प्रश्न विचारण्यात येतील

अ. सेवाविषयक व फौजदारी स्वरुपाची प्रकरणे

ब. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा प्रकरणात किंवा फौ. प्र. सं १९७५ मधील कलम १९७ किंवा मोटार वाहन कायदा किंवा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम १९९९ मध्ये मंजूरीमधील प्रकरणात अभियोग दाखल करण्याची परवानगी

क. सेवाविषयक व फौजदारी प्रकरणातील वेगवेगळया व महत्वाच्या मुद्दयावंर सध्याची न्यायिक स्थिती

ड. दिर्घोत्तरी लेखी परीक्षेकरिता सेवाविषयक व फौजदारी प्रकरणात न्यायालयात दाखल करावयाच्या शपथ पत्राचा मसुदा तयार करणे.

ई. मा.उच्च न्यायालय / मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणा समक्ष एखाद्या प्रकरणात दाखल करावयाचे परिच्छेदनिहाय अभिप्राय किंवा शपथपत्र (संक्षिप्त स्वरुपात)

८) उमेदवाराला निवडप्रक्रियेसाठी कोणताही प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

९) जे उमेदवार लेखी व मुलाखत परिक्षेत पात्र ठरतील अशा पात्र उमेदवारांकडून विहित साक्षांकन नमुना फॉर्म भरण्यात येऊन त्यांची चारित्र व पूर्वचारित्र पडताळणी करण्यात येईल व त्यानंतरच त्यांना कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल

१०) नियुक्त केलेल्या उमेदवारास करारनामा करणे अनिवार्य राहील.

११) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिका-यांना एकत्रित वेतन व अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चाच्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

१२) उमेदवारांनी वर विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी जाहिरातींचे दिनांकापर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

१३) **जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल**.

१४) अर्जासोबत २.५ से.मी. X २.५ से.मी. आकाराचे सध्याचे काढलेले ०२ रंगीत फोटो जोडावेत.

लेखी परीक्षेचा दिनांक उमेदवारास परीक्षेपूर्वी १५ दिवस अगोदर उमेदवारास पत्रान्वये कळविण्यात येईल तसेच कार्यालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असेल.

मुलाखतीसाठी अर्हता प्राप्त ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास, अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

लेखी परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन, उमेदवाराची निवड करण्यात येईल.

या कार्यालयात लेखी परीक्षेच्या वेळी तसेच मुलाखतीच्या वेळी हजर असतांना, मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक किंवा संपर्क साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये दिनांक. ११/०३/२०२२ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

वरील पद हे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून पूर्णतः कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेशित झालेले आहे. निवड प्रक्रियेबाबतची कार्यवाही करणे, तसेच उमेदवाराची निवड कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही टप्प्यावर केव्हाही रद्द करण्याचे तसेच परिक्षेसंबंधीचे नियमात बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिका-यास राहतील.

सही/-

( कुलवंत कु. सारंगल )
अपर पोलीस महासंचालक, वाहतूक
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

ठिकाण:- मुंबई.
दिनांक:-